**नियमित दिवाणी मुकदमा नं. १३/१९८८ मधील**

**निशाणी १०१ वरील आदेश**

**(गुंडू देसाई वि. रुक्मीणी राणे व.६)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मयत वादी कै. गुंडू गणेश देसाई यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरिता केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या मते सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील मुळ वादी गुंडू गणेश देसाई हे मयत झालेले आहेत. मयत वादी कै. गुंडू गणेश देसाई यांचे मृत्यूनंतर त्यांचे कायदेशीर वारस असलेले त्यांची पत्नी अरुणा गुंडू प्रभूदेसाई व मुलगी सौ. ममता व्यकंटेश प्रभूखानोलकर उर्फ शुभांगी गुंडू प्रभूदेसाई या दोघींची नावे दाखल झालेली होती. त्यापैकी अरुणा गुंडू प्रभूदेसाई या दि.२८.०१.२०२३ रोजी मयत झाल्या व मुळ वादी यांची मुलगी श्रीमती ममता व्यंकटेश प्रभुखानोलकर या दि.२१.१०.२०२३ रोजी निर्वंश मयत झाल्या आहेत. त्यांचे कायदेशीर वारस मुदतीत दाखल करणे आवश्यक होते. परंतु, दरम्यानच्या काळात सर्व वारसांना एकत्र येवून काम पहाणे शक्य नसल्याने अर्जदार यांचे कुलमुखत्यारपत्र घेणे, तसेच कायदेविषयक अज्ञानामुळे सदरचा अर्ज दाखल करणेस ५३ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर विलंब माफ न झालेस मयत वादीचे वारस रेकॉर्डवर न येता दावा अबेटेड राहून अर्जदार यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणारे आहे. त्यामुळे अर्जदार यांनी मयत वादी कै.गुंडू गणेश देसाई यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी १०६ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे कथनाप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रतिवादी क्र.१ व २ यांना मान्य व कबूल नाही. अर्जदार यांना वादी नं.२ब या दि.२०.१०.२०२३ रोजी

मयत झाल्या याची माहिती होती, तरीदेखील त्यांनी त्यांचे वारस मुदतीत अभिलेखावर आणलेले नाहीत. अर्जदार हे वादी नं.२ चे कायदेशीर वारस नसुन केवळ वादी नं.२ब यांची दावा मिळकत स्वतःचे नावावर करणेसाठी सदरचा वारस अर्ज दाखल केलेला आहे. सबब, अर्जदार यांनी दिलेला अर्ज कायदेशीर नाही, तरी तो फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.१ व २ यांनी केलेली आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ अर्जदार यांनी आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. अर्जदार यांचे कथनाप्रमाणे ते मयत वादी यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत. परंतु, प्रतिवादी यांनी ते वारस असल्याबाबत हरकत नोंदवलेली आहे. सदर हरकतीचा मुद्दा पहाता अर्जदार हे मयत वादीचे सरळ व कायदेशीर वारस नसलेस त्याबाबत योग्य ती हरकत दाव्याच्या योग्य टप्प्यावर घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य प्रतिवादी यांना आहे. तसेच या टप्प्यावर प्रतिवादी यांनी मयत वादी यांचे इतर कायदेशीर वारस असून अर्जदार हे कायदेशीर वारस नसल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा आपल्या कथनांच्या पुष्ठयर्थ दिलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये सध्यस्थितीमध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेशीक XXII नियम ५ प्रमाणे चौकशी करणेची आवश्यकता दिसून येत नाही. तसेच प्रतिवादी यांनी मयत प्रतिवादी यांचे मयत प्रतिवादी नं.६ ते ८, प्रतिवादी नं.३ हे मयत झालेले असून त्यांची तजवीज याकामी झालेली नाही. मुळात मुळ वादी मयत झाल्याने त्यांचे वारस अभिलेखावर आणण्याकरिता अर्जदार यांनी विलंब माफीकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे जोपर्यंत मयत वादीचे कायदेशीर वारस अभिलेखावर येत नाहीत

तोपर्यत त्यांना दाव्यामध्ये तजवीज करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. या कारणाकरिता देखील वादीचे वारस अभिलेखावर येण्यास झालेला विलंब माफ होणे आवश्यक दिसून येते. तसेच, दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी मयत वादी कै. गुंडू गणेश देसाई यांचे अर्जदार हे वारस म्हणून अभिलेखावर घेतलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण त्यांना सदर अर्जदार यांना दाव्यात दाखल झाल्यानंतर त्यांचा उलटतपास व पुरावा देणेचे पुर्ण स्वातंत्र्य आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे अर्जदार यांचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येतो. |
| २. | मयत मुळ वादी यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब रक्कम रुपये २००/- (रुपये दोनशे मात्र) इतका खर्च आकारुन माफ करणेत येतो. |
| ३. | खर्चाची रक्कम सरकार भरणा करावी. |

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.10.15 17:28:47 +0530

दिनांकः -१५/१०/२०२५. (श्रीम. आर.जी.कुंभार)

ठिकाणः- कुडाळ अति. सह दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर), कुडाळ.